जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph**.020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ६७६ दिनांक - ०९/०९/२०२३**

येरवडा पोलीस ठाणे पुणे शहर

**हुसेन ऊर्फ सोन्या युनुस शेख(टोळी प्रमुख) व त्याचे इतर ०९ साथीदार यांचेविरुध्द मकोका अंतर्गत कारवाई**

दि.२५/०७/२०२३ रोजी हुसेन ऊर्फ सोन्या शेख (टोळी प्रमुख) व रुपेश ऊर्फ दाद्या राजगुरु यांनी जुने भांडणे मिटवण्यासाठी एक लाख रुपये खंडणीची मागणी केली व जर खंडणी दिली नाही तर तुला बघुन घेवु अशी धमकी फिर्यादी यांना दिली. फिर्यादी यांनी खंडणी दिली नाही नाही म्हणुन दि. ३०/०७/२०२३ रोजी फिर्यादी त्यांची पत्नी हॉस्पिटलमध्ये ॲडमिट असल्याने तिला भेटणे करिता ससुन हॉस्पीटल पुणे येथे जाणे करीता रिक्षा स्टँन्डकडे पायी जात असताना इराणी मार्केट येरवडा येथे फिर्यादी यांचे वैर असलेले हुसेन ऊर्फ सोन्या शेख,रुपेश ऊर्फ दादया राजगुरु, अमिर ऊर्फ शंक्या शेख रा.येरवडा पुणे व त्यांचे इतर सहा ते सात साथीदार यांचे कडे हातात तलवार, दगड व धारदार हत्यारे होती. त्यावेळी त्यांनी फिर्यादी कडे बघुन, थांब तु जास्त भाई बनतोस काय तुला आज आम्ही दाखवतोच असे म्हणत फिर्यादीला शिवीगाळ करण्यास सुरुवात केली तेव्हा फिर्यादी घाबरून पळून जाऊन तेथील शेलार चाळ येथे एका घरात घुसले व घराचा दरवाजास कडी लावुन घेतली. तेव्हा वरील सर्वजण तेथे आले व त्यांनी तेथे आरडा ओरडा करुन खिडकीच्या काचा फोडुन, दरवाजावर लाथा मारून सदर परिसरात दहशत निर्माण केली. त्याबाबत फिर्यादी यांनी येरवडा पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने त्याबाबत **येरवडा पोलीस स्टेशन गु.र.नं. ५३२/२०२३ भा.द.वि.कलम ३८४,१४३,१४७ ,१४८,१४९,३३७,४२७,५०४,५०६ आर्म ॲक्ट कलम ४(२५),महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)सह १३५ क्रिमीनल लॉ ॲमेंडमेंट कलम ३ व ७** प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दाखल गुन्ह्याचे तपासा दरम्यान यातील आरोपी नामे(१) **वसीम हैदरअली मोगले वय २२ वर्षे रा. गेनबा लक्ष्मीनगर येरवडा पुणे.(टोळी सदस्य)** (२) **अमिर ऊर्फ शंक्या युनुस शेख वय १८ वर्षे रा.स.नं.१२, लक्ष्मीनगर येरवडा पुणे** यांना अटक करण्यात आलेली आहे.तसेच इतर ३ पाहिजे आरोपी असुन ५ विधी संघर्षीत बालक आहेत.

नमुद आरोपी **हुसेन ऊर्फ सोन्या युनुस शेख (टोळी प्रमुख)(पाहीजे आरोपी)** याने संघटित टोळी तयार केली असुन त्याचेसह अन्य सदस्यांसाठी आपले अधिपत्याखाली प्रत्येक गुन्ह्यात काही सामाईक व काही नवीन साथीदार यांना सोबत घेवुन स्वतःचे संघटीत टोळी तयार करुन स्वतःचे टोळीचे वर्चस्व निर्माण करण्यासाठी गुन्हे केले असुन त्यामध्ये खुनाचा प्रयत्न करणे,गंभीर दुखापत करणे,घरफोडी करणे,शासकिय नोकरास त्याचे शासकिय कर्तव्य बजावण्यात अडथळा निर्माण करणे,बेकायदेशीर जमाव जमविणे,खंडणी मागणे, धारदार हत्यारे जवळ बाळगुन दहशत करणे यासारखे गंभीर स्वरुपाचे गुन्हे वारंवार केलेले आहे. त्यांचेवर प्रतिबंधात्मक कारवाई करुन देखील त्यांनी पुन्हा पुन्हा गुन्हे केलेले आहेत.

नमुद आरोपी विरूध्द दाखल गुन्ह्यास महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१)(ii),३(२),३(४) प्रमाणे अंतर्भाव करण्यासाठी मा.वरीष्ठ पोलीस निरीक्षक येरवडा पोलीस स्टेशन पुणे श्री.बाळकृष्ण कदम यांनी मा.पोलीस उप आयुक्त परीमंडळ ०४ पुणे शहर श्री.शशिकांत बोराटे यांचे मार्फतीने मा.अपर पोलीस आयुक्त पूर्व प्रादेशिक विभाग पुणे शहर श्री.रंजनकुमार शर्मा यांना प्रस्ताव सादर केला होता.

सदर प्रकरणाची छाननी करुन येरवडा पोलीस स्टेशन गु.र.नं.५३२/२०२३ भा.द.वि.कलम ३८४,१४३, १४७,१४८,१४९,३३७,४२७,५०४,५०६ आर्म ॲक्ट कलम ४(२५),महाराष्ट्र पोलीस अधिनिय मकलम ३७ (१) सह १३५ क्रिमीनल लॉ ॲमेंडमेंट कलम ३ व ७ प्रमाणे दाखल असलेल्या गुन्ह्यात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१)(ii),३(२),३(४) प्रमाणेचा अंतर्भाव करण्याची मा.अपर पोलीस आयुक्त पूर्व प्रादेशिक विभाग,पुणे शहर,श्री.रंजनकुमार शर्मा यांनी मान्यता दिलेली आहे.

सदर गुन्ह्याचा पुढील तपास मा.सहायक पोलीस आयुक्त,येरवडा विभाग,पुणे शहर,श्री.संजय पाटील हे करीत आहेत.

सदरची उल्लेखनीय कामगिरी मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर श्री.रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त पुणे शहर श्री.संदिप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग पुणे शहर श्री.रंजनकुमार शर्मा, मा.पोलीस उप आयुक्त परीमंडळ ०४ पुणे शहर श्री.शशिकांत बोराटे, मा.सहा पोलीस आयुक्त येरवडा विभाग,पुणे शहर श्री.संजय पाटील,यांचे मार्गदर्शनाखाली मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक येरवडा पोलीस स्टेशन, पुणे शहर श्री.बाळकृष्ण कदम पोलीस निरीक्षक (गुन्हे)श्रीमती कांचन जाधव, पोलीस उप निरीक्षक श्री. रविंद्रकुमार वारंगुळे, पोलीस अंमलदार सचिन माळी,सचिन शिंदे,प्रकाश चौधरी व देविदास वांढरे यांनी केली आहे.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार यांनी पोलीस आयुक्त,पुणे शहर आयुक्त म्हणुन कार्यभार घेतल्यानंतर गुन्हेगारी नियंत्राणांवर बारकाईने लक्ष देवुन शरीराविरुध्द व मालमत्ते विरुध्द गुन्हे करणारे व नागरीकां मध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवुन,गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन होईल यावर भर देण्या बाबत सर्व पोलीस अधिकारी व अमंलदार यांना निर्देश देण्यात आलेले आहेत. **त्यांचे मार्गदर्शनाखाली मकोका अंतर्गत केलेली ही ५८ वी कारवाई आहे.**